Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.

Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# ज्ञानज्योती सावित्रीबाईंचा जन्मदिवस बालिका दिवस म्हणून उत्साहात साजरा

वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचा जयंतीचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. एन. डी. पार्लावार, यांचे अध्यक्षतेखाली तसेच प्रा. अंजली गहरवार, प्रा. धिरज वसुले, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी, डॉ. रविंद्र सातभाई, डॉ. प्रशांत शिंगोटे, श्री. मंगेश शेटे, सहायक कुलसचिव यांचे उपस्तिथीत पार पडले.

या प्रसंगी सहयोगी अधिष्ठाता, डॉ. एन. डी. पार्लावार, तथा उपस्थित शिक्षक वृंदानी सावित्रीबाईंच्या प्रतिमांना हारार्पन करून अभिवादन केले. याच कार्यक्रम प्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवडाचे देखील उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी डॉ. एन. डी. पार्लावार, सह. अधिष्ठाता यांनी सवित्रीबाई फुले यांचे जिवनवृत्तांत सांगतांना आपले मत व्यक्त केले सावित्रीबाईंनी स्त्रीशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्या काळात महिलांकरिता शिक्षण हे क्रांतीकारी पाऊल होते. त्यांनी पुणे शहरात १८ शाळा उघडल्यामुळे त्यांचा सत्कार करून त्यांच्या शाळांना ब्रिटिश सरकारने अनुदान दिले होते. महात्मा फुले, सावित्रीबाई फले, कर्मविर भाऊराव पाटिल व पंजाबराव देशमुख यांनी शिक्षणाची चळवळ उभी केल्यामुळेच स्त्रीयांची उत्तरोत्तर प्रगती झालेली दिसून येत आहे. त्यांच्या कार्यामुळेच स्त्री शिक्षणाची चळवळ, बाल विवाह कायदा, विधवा संरक्षण कायदा इ. महिलांशी सबंधीत क्रांतीकारी कार्याकरीता सावित्रीबाई फुले यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. महाराष्ट्र सरकारने सन १९९५ मध्ये ३ जानेवारी हा सावित्रीबाई यांचा जयंती दिवस "बालिका दिवस" म्हणून साजरा करण्यात येतो. सावित्रीबाईंचा सामाजिक कार्याचा वारसा मुलिंनी चालवावा असे डॉ. पार्लावार यांनी विद्यार्थ्याना आवाहन केले. तसेच मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त त्यांनी मराठी भाषा अग्रगण्य असून मराठी भाषेत पत्रव्यवहार करण्याचे मानक असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी राज्यभाषा मराठीचा विस्तार करावा असे मार्गदर्शन केले.

यावेळी प्रा. अंजली गहरवार म्हणाल्या की, समाजातील अनेक वाईट प्रथा असतांना फुले या दांम्पत्याने आदर्श जीवन कसे असावे यांचा आदर्श घालुन दिला. शिक्षण घेवून कसे जीवन जगावे हे महत्वाचे आहे. त्यांची जयंती साजरी करण्यामागे जयंतीदिनी त्यांच्या कार्याची उजळणी करणे व त्यांच्या कार्याची प्रेरणा घेवून आपल्यामधील अज्ञान काढण्यासाठी सावित्रीबाईंची वैचारिक क्रांती महत्वाची असुन ती आपल्यामध्ये रूजवावी लागेल असे मार्गदर्शन केले. तसेच मराठी भाषा संवर्धनाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. रविंद्र सातभाई यांनी सावित्रीबाईंच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. व मराठी भाषा ही संतांची भाषा असुन त्यांची गरज समाजाची उन्नती साधण्याकरीता होते असे सांगीतले..

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. सोनाली सिरस्कर हिने केले, तर आभार कुशल पाटिल या विद्यार्थ्याने केले. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी प्रज्वल डोंगरे, हर्षा माधनकर, विश्वास राठोड, प्रतिक्षा पथाडे, सुरज गुप्ता, व मिताली राहटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तेलंगणातील विवक गौरू व साईकुमार वेमुला या विद्यार्थ्यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा या निमित्त मराठीत आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाला डॉ. संदेश बांगर, प्रा. हेमंत वाघ, डॉ. रोशन शिंदे, श्री रूपेश राऊत, डॉ. वैष्णवी परमा, एकनाथ भंकाळे, कु. भारती मेश्राम, पंकज जैन, अस्मिता पाटिल, प्रविण डोंगरे, शुभम धार्मिक, निळकंठ मानकर, इ. कर्मचारी व विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थीत होते.